**<u>निशाणी ५९ खालील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता तरतूद आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती घालण्यास परवानगी मिळावी या मागणीसाठी वादींनी दाखल केलेला आहे.

२. वादींचे अर्जातील कथन की, हजर प्रतिवादी यांनी दाव्यामध्ये त्यांची कैफियत सादर केली असून, त्यांनी त्यात वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुटुंबाच्या सर्व मिळकती दाव्यात सामील केले नसल्याची तक्रार उपस्थित केलेली आहे. वादींनी त्या संदर्भात कागदपत्रे काढली असता ती बाब समजून आल्यामुळे त्या दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक झालेले आहे. तसेच सदर मिळकतीच्या अनुषंगाने हक्कदार असलेल्या इसमांना देखील दाव्यात पक्षकार करणे आवश्यक व गरजेचे असल्याने प्रस्तुतचा अर्ज सादर करावा लागत आहे. तसेच समाविष्ट नसलेल्या मिळकतीच्या अनुषंगाने दाव्यात मागितलेल्य अनुतोष्ज्ञ कॉलममध्ये देखील दुरुस्ती घालणे आवश्यक असून, अर्जात मागितलेल्या दुरुस्तीमुळे दावा विषय व स्वरुपात कोणताही बदल होत नसून अर्ज मंजूर होणे गरजेचे व आवश्यक आहे. तरी, अर्ज मागणीप्रमाणे मंजूर करण्यात येवून दावा दुरुस्तीस परवानगी असावी अशी मागणी वादींतर्फे करण्यात आलेली आहे.

३. प्रस्तुत अर्ज मागणीवर प्रतिवादींकडुन म्हणणे सादर करुन विरोध दर्शविण्यात आलेला आहे. प्रतिवादींचे म्हणणे की, अर्जातील मजकूर खरा व बरोबर नसून, मागणी केलेली दुरुस्ती मुदतीत नाही. वादींना दाव्यात निर्माण झालेली पोकळी (Lacuna) भरुन काढता येणार नसून प्रतिवादींनी उपस्थित केलेल्या बचावास बाधा येईल अशी दुरुस्ती मागता येणार नाही. खरेदीखता संदर्भात स्पष्ट वर्णन अर्जात नसून, त्यावर योग्य ती कोर्ट फी भरणे गरजेचे आहे. सबब, वादींची अर्ज मागणी कायदेशीर ठरत नसल्याने ती वादींवर खर्च लावून फेटाळण्यात यावी.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे बारकाईने वाचन केले. प्रकरणातील कागदपत्रे पडताळून पाहिले असता, प्रस्तुतचा दावा हा वादमिळकतीबाबत जाहीर ठराव करुन त्यातील वादींचा हिस्सा वाटप होवून मिळावा यासह निरंतर ताकीद आदेशासाठी दाखल दिसून येतो. प्रतिवादींच्या

कैफियतीमधील परिच्छेद क्रमांक ९ मधील कथन विचारात घेता, त्यात वादींनी कुटुंबाच्या सर्व मिळकतींचा समावेश केलेला नाही असा आक्षेप व बचाव कैफियतीमध्ये घेतलेला आहे दिसून येत असून, दाव्यात आवश्यक ते पक्षकार सामील केलेले नाही असाही मुद्दा उपस्थित केलेला आहे. प्रकरणात निर्णय करण्यासाठी अंतर्भूत असलेले मुद्दे यासह अर्ज मागणी विचारात घेता, वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे मुळ दावा कथनात कोणताही अमुलाग्र बदल होताना दिसून येत नाही. उलटपक्षी, वादाच्या अनुषंगाने असलेल्या कुटुंबाच्या सर्व मिळकती व त्या संदर्भातील हक्कदार इसम दाव्यात पक्षकार असणे अंतिम निर्णयासाठी आवश्यक व गरजेचे आहे. प्रकरणातील घटना व परिस्थिती विचारात घेता, प्रतिवादींनी अर्ज मागणीस दर्शविलेल्या विरोधाचे समर्थन करता येणार नाही. सबब, वादींचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असला तरी प्रकरणाचा कालावधी व अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब या बाबींचा विचार करता, वादींवर खर्च लादणे आवश्यक व गरजेचे दिसून येत आहे. परिणामी, प्रस्तुत अर्जावर खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतेः

## आदेश

१. अर्ज रुपये १,०००/- (एक हजार फक्त) खर्चावर मंजूर.

२. खर्चाची रक्कम वादींकडुन प्रतिवादींना देय राहील.

३. अर्जात नमूदप्रमाणे दावा दुरुस्तीस वादीस परवानगी देण्यात येते.

४. वादींनी विहीत कालावधीत दुरुस्ती करुन दुरुस्त दावा प्रत पुढील कार्यवाहीसाठी सादर करावी.

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.06.24 13:35:39 +0530

दिनांक – २४.०६.२०२५.

( आर एम कराडे )

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माढा.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Nagesh N. Konda, Grade II |
| (b) | Court | : | CJSD, Madha. |
| (c) | Order signed by P.O. on | : | 24 June, 2025. |
| (d) | Order uploaded on | : | 24 June, 2025. |